Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NBA
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 15/08/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

### शाहीर, लोककवी वामनदादा कर्डक



वामनदादा कर्डक हे शाहीर, कवी आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिकच्या सिन्नर जिल्ह्यामधील देशपंडी या गावी झाला. घरच्या गरीब परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही; पण त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मजात देणगी होती. त्यांच्याजवळ लेखणी, वाणी आणि संगीत यांचा सुरेख त्रिवेणी संगम होता. वयाच्या २०व्या वर्षापासून आपल्या साध्यासोप्या शब्दांतून, लोकभाषेतून शाहिरी रचना, कवने, गीते याद्वारे लोककवी वामनदादांनी जनजागृती केली. मानवता, क्षमता, बंधुभाव, शील, करुणा, मैत्री या तत्त्वांवर दादांची लोकगीते आधारित आहेत. आंबेडकरी भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातिव्यवस्था, मनोरंजनातून प्रबोधन या विषयावरही दादांची लोकगीते आजही प्रभावी वाटतात. चळवळीच्या अशा असंख्य गाण्यांबरोबरच दादांनी पर्यावरण, हुंडाबंदी, ऊसतोड कामगार, दुष्काळ अशा भिन्न विषयांवर मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे.

वामनदादांची गीते चित्रपटातूनही गाजली. 'चल गं हरिणी तुरू तुरू', 'सांगा या वेडीला, माझ्या गुलछडीला' यासारखी गाणी आजही ओठावर ताल धरतात. वामनदादा १९३४ साली मुंबईला गेले. तेथे त्यांना चांगली नोकरीही मिळाली. पण तिथे त्यांचे मन रमले नाही. त्या काळी मुंबईत डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीचे दिवस होते. वामनदादा डॉ. आंबेडकरांच्या सभा मन लावून ऐकत. या स्फूर्तीतूनच दादा पुढे समता सैनिक दलाचे कार्यकर्ते झाले आणि त्यांनी भीमकार्यात स्वतःला वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य अवीट लोकगीतांनी समाजमनाला भुरळ घातली. म्हणूनच वा. म. कुलकर्णी यांनी दादांना 'लोककवी' तर जनतेने त्यांना 'वामनदादा' ही पदवी बहाल केली. वामनदादांच्या धारदार व पहाडी आवाजाची डॉ. आंबेडकरांनीही मुक्तकंठाने प्रशंसा केली. वामनदादा कर्डक यांचे १५ मे २००४ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Aug 15, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401